# प्रेसनोट

दिनांक– ११/१२/२०१८.

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका येथील आरोग्य निरीक्षकास लाच स्विकारताना अटक

दिनांक ११/१२/२०१८ रोजी, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, विभाग क्र. ज ४ येथील वरिष्ठ आरोग्य निरीक्षक **मोहन राजाराम दिघे,** वय ५४ वर्षे यांना यातील तक्रारदार यांच्याकडून ५,०००/– रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांना नोकरीमध्ये कायम करण्याकरीता मुल्यमापन अहवालावर शेरा लिहीण्यासाठी तसेच इच्छित ठिकाणी डयुटी देणे व हजेरी नोंदविण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे १०,०००/– रुपयांची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे तक्रार नोंदविली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ११/१२/२०१८ रोजी पडताळणी केली असता, वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन असीबी, ठाणे युनिट यांनी सापळयाचे आयोजन करुन **लोकसेवक मोहन राजाराम दिघे** यांना तक्रारदार यांच्याकडून लाचेचा पहिला हप्ता म्हणुन ५,०००/–(पाच हजार) रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. गुन्हयाचा पुढील तपास श्री.अंकुश बांगर, पोलीस उप अधीक्षक  असीबी, ठाणे हे करीत असुन त्यांचा संपर्क क्रमांक ९४२३५४५७०९ असा आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

**१) टोल फ्री क्र. :- 1064**
**२) दुरध्वनी क्रमांक :- 022–25427979**
**३) ई-मेल आयडी :- spacbthane@mahapolice.gov.in**
**४) वेबसाईट :- www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner